# जिल्हा परीषदेच्या अखत्यारीतील शाळांमध्ये क्रीडा सुविधा विकसित करण्याकरीता

# कृति आराखडा

## प्रस्तावना:

केंद्र शासनाच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालयामार्फत सन 2008-09 या वर्षात पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियान हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. सदर अभियानाद्वारे संपुर्ण देशातील ग्रामीण भागात क्रीडाविषयक उपक्रम राबवून ग्राम स्तरावर व तालुका स्तरावर किमान सुविधा निर्मिती व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून या माध्यमातून क्रीडा वातावरण निर्मिती व क्रीडा विषयक जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## योजनेचे स्वरूप :

सदर योजनेंतर्गत प्रत्येक पंचायतीमधून किमान 10 टक्के गावांची निवड करून राज्य, जिल्हा, पंचायत, व ग्राम स्तरावर समित्यांची स्थापना करून या समित्यांच्या संनियंत्रणात निवड केलेल्या गावांमध्ये क्रीडा विषयक उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. पंचायत व ग्राम स्तरावर क्रीडाविषयक किमान सुविधांची निर्मिती, क्रीडाविषयक उपक्रमांचे नियोजन, क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा सहभाग व ग्राम, पंचायत व जिल्हा स्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन या अभियानाद्वारे केले जाणार आहे.

## अनुदानाच्या बाबी :

सदर योजना राज्यात राबविण्याकरीता केंद्र शासनामार्फत बीज भांडवलापोटी 75 टक्के तर राज्य शासनामार्फत 25 टक्के तरतूद करण्याचे योजनेत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. इतर सर्व बाबींबरीता 100 टक्के अनुदान केंद्र शासनामार्फत प्राप्त होणार आहे. उपलब्ध होणा–या तरतूदीतून खालील शीर्षांवर निधी खर्च होणे अपेक्षित आहे –

| अ.क्र. | अनुदानाची बाब | अनुदानाचा दर |
|---|---|---|
| 1 | क्रीडा सुविधा निर्मिती (बीज भांडवल) | रू.1.00 लक्ष प्रति ग्रामपंचायत व रू.5.00 लक्ष प्रति पंचायत |

| | | |
|---|---|---|
| | | समिती |
| 2 | वार्षिक निर्वाह अनुदान | रू.0.10 लक्ष प्रति ग्रामपंचायत व रू.0.20 लक्ष प्रति पंचायत समिती |
| 3 | व्यवस्थापन अनुदान | रू.0.12 लक्ष प्रति ग्रामपंचायत व रू.0.24 लक्ष प्रति पंचायत समिती |
| 4 | क्रीडा स्पर्धा अनुदान | रू.0.50 लक्ष प्रति पंचायत समिती व रू.2.00 लक्ष प्रति जिल्हा |
| 5 | पारितोषिकांकरीता अनुदान | रू.0.45 लक्ष प्रत्येक तालुकास्तरावर प्रथम तीन क्रमांक संपादन करणाया खेळाडूंकरीता तर रू.0.90 लक्ष जिल्हास्तरावर प्रथम तीन क्रमांक संपादित करणाया खेळाडूंकरीता. |

## जिल्हाची सद्यस्थिती :

- सन 2013-14 या वर्षात नंदुरबार जिल्हात जिल्हा परीषदेमार्फत संचालित एकूण 1387 शाळा आहेत.
- यु डाईस डेटा वर उपलब्ध माहितीनुसार या शाळांपैकी 484 शाळांमध्ये क्रीडांगणे उपलब्ध आहेत तर 903 शाळांकडे अद्यापही क्रीडांगणे उपलब्ध नाहीत.
- क्रीडांगणे उपलब्ध असलेल्या शाळांमध्ये विविध क्रीडा प्रकारांकरीता आवश्यक प्रमाणित आकाराची क्रीडांगणे उपलब्ध नसून क्रीडांगणांकरीता जागा उपलब्ध आहेत.
- या जागांवर विविध क्रीडा प्रकार जसे कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, कुस्ती याकरीता आवश्यक प्रमाणित आकाराची क्रीडांगणे तयार करता येणे शक्य आहे.
- राज्य शासनामार्फत उच्च दर्जाचे क्रीडापटू तयार करण्याकरीता राज्यातील 11 जिल्हात क्रीडा प्रबोधिनी चालविण्यात येतात. या क्रीडा प्रबोधिनींमध्ये प्रवेशाकरीता वय वर्षे 8 ते 14 या गटातील विद्याथ्र्यांकरीता शारीरिक क्षमता चाचण्यांचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी साधारणत: एक लाख विद्यार्थी या चाचण्यांमध्ये सहभागी होतात. तथापि, क्रीडा प्रबोधिनीमध्ये निवड होणा–या खेळाडूंची संख्या ही सरासरी एक ते दोन इतकी आहे.
- उपरोक्त संख्या दर्शविते की, जिल्हातील विद्याथ्र्यांची मुलभूत शारीरिक क्षमता ही अत्यंत कमी आहे. ही शारीरिक क्षमता विकसित करण्याकरीता विद्याथ्र्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात क्रीडाविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. क्रीडाविषयक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याकरीता जास्तीत जास्त क्रीडांगणे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

## प्रस्ताव :

राज्य शासनाने दि.30 एप्रिल 2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात क्रीडांगणांची कामे घेण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. सदर निर्णयास अनुसरून जिल्हातील जिल्हा परीषदेच्या अखत्यारीतील शाळांचे ठिकाणी क्रीडांगणे विकसित करण्यास प्राधान्य देण्यात यावे. याकरीता खालील कार्यवाही होणे अपेक्षित आहे –

- यु डाईस डेटावर उपलब्ध माहितीनुसार क्रीडांगणाकरीता जागा उपलब्ध असलेल्या शाळांची स्वतंत्र यादी तयार करणे.
- ज्या शाळांना क्रीडांगणाकरीता जागा उपलब्ध नाही अशा शाळांना जागा उपलब्ध करून घेण्यासाठी कालावधी निश्चित करून देणे.
- तालुकानिहाय लोकप्रिय क्रीडा प्रकारांची प्राधान्य यादी तयार करणे जेणेकरून विकसित करावयाच्या क्रीडांगणांचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करता येणे शक्य होईल.
- जिल्हा परीषदेच्या बांधकाम विभागाने सर्वसाधारण आराखडा व अंदाजपत्रक तयार करून देणे.
- जिल्हा परीषदेच्या बांधकाम विभागामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संबंधित विभागास सादर करावयाचा प्रस्ताव तयार करणे.
- क्रीडा विभागामार्फत जिल्हातील शाळांची क्रीडा सहभागाबाबतची तालुकानिहाय माहिती उपलब्ध करून दिली जाईल. या माहितीच्या आधारे शाळांचा प्राधान्यक्रम तयार करता येणे शक्य होईल.
- शाळांमधून विकसित करावयाच्या क्रीडांगणांचा प्रारूप आराखडा व अंदाजपत्रक तयार करून सुलभ संदर्भास्तव सोबत जोडून सादर केला आहे. सदर आराखड¬ानुसार क्रीडांगणे विकसित झाल्यास संपुर्ण जिल्हात एकसारखी क्रीडांगणे तयार करता येणे शक्य होईल.
- जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सदर प्रयोजनाकरीता निधी उपलब्ध करून दिला गेल्यास या कार्यालयामार्फत देखील सदर योजना राबविता येणे शक्य आहे.

******